लोकमत
epaper.lokmat.com
पुणे, रविवार, दि. १ मे २०२२ ५

# ‘खेलो इंडिया’त वैष्णवला सुवर्णपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : बंगळुरू येथे २४ ते २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वैष्णव ठाकूर याने वेटलिफ्टिंग या खेळाच्या ९६ किलो वजनी गटात १३५ किलो स्नॅच व १७८ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण ३१३ किलो वजन उचलून सुवर्ण पदकाची कमाई केली.

या यशाबद्दल वैष्णव ठाकूरच्या विशेष सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी खेड पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक सतीश गुरव, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, साहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लाड, गोपनीय विभागाचे संदीप भापकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.



वैष्णव ठाकूरचा सन्मान करताना अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, नाना टाकळकर व इतर.

संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी वैष्णव ठाकूरचे अभिनंदन करताना त्याच्या कामगिरीबद्दल अभिमानाची भावना व्यक्त केली. वैष्णवने विद्यापीठाचे नाव उंचावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संस्थाचालक म्हणून आम्ही सर्व राष्ट्रीय खेळाडूंच्या पाठीशी सर्वार्थाने उभे आहोत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

वैष्णव ठाकूरला क्रीडा संचालक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन आणि राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.